# दिनांक १९.०९.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक १९.०९.२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. २, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ५, महानगरपालिका, अमरावती
मा.श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई, अमरावती
मा.श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ ,अमरावती
मा.श्री.विलास देशमुख , वृक्ष तज्ञ, अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

## दि.१९.०९.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

## झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री.मनोहर अरतपायरे, छत्रसाल नगर, अमरावती | बदाम | ०१ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एका बाजुला वाकलेल्या बदाम वृक्षाच्या **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या एका बाजूला झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २. | सौ. मंगला अनिल वाढे, साईकृपा कॉम्प्युटर टायपिंग इंस्टिटयुट, लक्ष्मी नगर, अम. | रानटी झाड | ०१ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सोनमोहरच्या झाडांच्या फांद्या ज्या घराच्या दिशेने गेलेल्या आहेत. त्या **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **अर्जदाराच्या घराकडे गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराच्या घराकडे गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | अध्यक्ष श्री. नित्यानंद दरबार कानडी बाबा आश्रम, रामपुरी कॅम्प, अमरावती | आबां-१, कडुनिम-१, बोर-१ | ०३ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता आंबा, कडुनिम व बोर या झाडांच्या फांद्या ज्या मंदीराकडे गेलेल्या आहेत. त्या **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **झाडांच्या फांद्या ज्या मंदीराकडे गेलेल्या आहेत त्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **झाडांच्या फांद्या ज्या मंदीराकडे गेलेल्या आहेत त्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४. | श्री. प्रशांत म. फुसे, पुर्वा टाऊनशिप, अर्जुन नगर, अमरावती | सोनमोहर व इतर | ०२ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता रस्त्याचे कडेला सोनमोहर चे झाड आहे. त्या झाडांच्या फांद्या रस्त्याचे बाजुला जमिनीपर्यंत झुकलेल्या आहे. त्या **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **रस्त्यावर झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **रस्त्यावर झुकलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५. | श्री. प्रमोद ना. कोळमकर, मॉ जिजाऊ कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती | गुलमोहर-१, महारूख-१, कडुनिम-१ | ०३ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता महारूख चे झाड पुर्णपणे सुखलेले असल्यामुळे परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच एक गुलमोहर व एक कडुनिम या झाडांच्या कडेला असलेल्या व वाढलेल्या **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **एक वाळलेले महारुखचे झाड काढण्यास हरकत नाही. गुलमोहर व कडूनिंब या झाडांच्या कडेला वाढलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.** | **एक वाळलेले महारुखचे झाड काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.गुलमोहर व कडूनिंब या झाडांच्या कडेला असलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६. | प्रवर अधिक्षक डाकघर, अमरावती विभाग, कॅम्प, अमरावती | | | आज दि. १८/०९/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने त्याच्या परिसरातील वृक्षांची यादी सादर केली असुन अर्जदार डाकतार विभाग, कार्यालय कॅम्प, अम. यांचे कार्यालयीन परिसरात १५० साग वृक्ष व इतर ७३ विविध प्रजातीची (सोबतच्या लिस्ट प्रमाणे) असे एकुण २२३ वृक्ष असल्याचे दिसुन आले. अर्जदारास अंतर्गत रस्त्यावर झुकलेल्या वृक्षाच्या तसेच विद्युत तारेकडे व रहदारीला अडचणीला ठरणा-या ३५ विविध प्रजातीच्या (लिस्ट प्रमाणे) **वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास** | **विद्युत तारेकडे व रहदारीला अडचणीला ठरणा-या ३५ विविध प्रजातीच्या (लिस्ट प्रमाणे) वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारेकडे व रहदारीला अडचणीच्या ठरणा-या ३५ विविध प्रजातीच्या (लिस्ट प्रमाणे) वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| ७. | आशा मदन पाठक, संतोष नगर, अमरावती | कडूनिम | ०१ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर कडूनिमाचे एक झाड रस्त्यावर घरासमोर आहे. घराच्या फांद्या इलेक्ट्रीक तारात गेलेल्या आहेत. त्या झाडाच्या फांद्या MSEB च्या सहकार्याने **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या विद्युत विभागाच्या सहाय्याने काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८ | श्री.एन. एच. शहा, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती | शंकेश्वर | ०१ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर शंकेश्वराचे झाड रस्त्याचे कडेंला घराच्या कंपाउंडला लागुन आहे. झाड हिरवेगार आहे. झाड फार जाड व उंच आहे. या झाडाच्या मुळांमुळे घराच्या कंपाउंडला व पाण्याच्या टाकीला तडा गेलेल्या आहे. सदर झाड काढण्याची परवानगी देण्याकरीता नियमानुसार रू. ६०००/- इतकी अनामत रक्कम घेवून **वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्यास हरकत नाही** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर १ शंकेश्वर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ९ | श्री. चेतनदास बालाजी मंदीर संस्था, पदाधिकारी व व्यवस्थापक, बेजनाथ केसरवानी, अम. | चेरीवृक्ष | ०१ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर वृक्ष भिंतीला लागुन असुन त्याच्या फांद्या खाली आलेल्या आहेत. झाडामुळे भिंत केव्हाही पडू शकते. त्यामुळे सदर झाड काढणेकरीता नियमानुसार रू. ६०००/- इतकी **अनामत रक्कम घेवून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्यास हरकत नाही** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर १ चेरीवृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १० | श्री. संजय एकनाथ तायवाडे, राजमाता कॉलनी, रहाटगांव चौक, अमरावती | नारळ | ०१ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता नारळाचे एक झाड नालीच्या बांधकामामध्ये मध्यभागी येत असल्यामुळे नियमानुसार रू. ६०००/- इतकी अनामत रक्कम घेवून **वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. परंतू याबाबत उपअभियंता बांधकाम विभागामार्फत यांचा अहवाल प्राप्त झाला असुन त्यामध्ये नालीचे बांधकाम मनपा मार्फत सुरू असुन सदर वृक्ष त्यामध्ये येत आहे. सदर वृक्ष हा रस्त्याचे लगतचा आहे. त्यामुळे रू. ६०००/- इतकी अनामत | **वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **सदर काम मनपा अंतर्गत असल्याने १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर उप अभियंता यांचे मार्फत वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम न घेता एका वृक्षाचे बदली तिन वृक्ष लावण्याचे अटीवर परवानगी देण्यास हरकत नाही, सबब निर्णयार्थ सादर. | | |
| ११ | श्री.बाळासाहेब ना. घटारे, श्रीराम नगर, अमरावती | | | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर तिन आंब्याचे झाड घराच्या आवारात आहे. हिरवीगार आहे. झाडे तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अर्जामध्ये नमुद कारण संयुक्तीक नसल्यामुळे **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **झाडे हिरवीगार आहेत व अर्जामध्ये नमुद कारण संयुक्तीक नसल्यामुळे वृक्ष काढण्यास नाकारावे.** | **झाडे हिरवीगार आहेत.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १२ | **अब्दुल साजीद अब्दुल समद, मौजे नवसारी, स.क्र.४/१/अ** | कडुनिम-४, सिताफळ -४, निंबू-३, अशोका-५, बांबू-८ | २४ | दि.१७/०९/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने एक हेक्टर ९२ आर शेताचे एनए केले असुन त्यास मान्यता असल्याचे दिसुन आले. शेताच्या सिमेवर असलेल्या जागेत त्यांना डुपलेक्स इमारती बांधावयाचे आहे असे श्री.अग्रवाल (मालकाचे प्रतिनिधी) यांनी सांगितले. डुपलेक्स इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला असुन त्यास अद्याप ससंनर विभागाची मान्यता मिळाली नाही. व तसा प्रस्ताव हा सादर केलेला नसल्याचे सांगण्यात आले. सबब सदर जागेवर बांधकाम करण्यासाठी फ्लॅट धारकास परवानगी मिळाल्यानंतर त्यात येणा-या बांधकामास अडचण ठरणा-या वृक्षांना ससंनर विभागाने चिन्हांकीत केल्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी द्यावी किंवा कसे? याचा निर्णय घेता येईल, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. अर्जात नमुद केल्यानुसार अर्जदार यांनी ADTP कार्यालयाकडून नकाशा सिमांकन मंजुर करण्यात आले आहे. सदर अभिन्यासाला कंपाउंड वॉल कामात सदर वृक्ष हे येत आहे. त्यामुळे याबाबत सदर वृक्ष काढण्याकरीता निर्णय घेण्याचे करीता सादर. | **सदर अभिन्यासास महानगरपालिकेची मंजुरी दिली असल्याने मंजूर अभिन्यासास कंपाऊंड वाल बांधण्याकरिता परवानगी देणे क्रमप्राप्त आहे.** | **कंपाऊंड वाल बांधकामात येणारे वृक्ष नियमानुसार ठेव स्विकारून १:३ याप्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

# झोन क्र.२

| **अ.क्र.** | **अर्जदाराचे नाव व पत्ता** | **वृक्षाचे वर्णन** | **झाडांची संख्या** | **तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** | **चर्चा** | **वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्री. राजु दामोधर गोंडाणे, कल्याण नगर,** | सोन मोहर वृक्ष फांदया | १ | दिनांक १५/०९/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.सोनमोहोर वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाढलेला हिरवागार आहे. वृक्षाच्या विद्युत तारेकडे झुकलेल्या तसेच, अर्जदाराचे घरावर गेलेल्या फांद्या (४-६ इंच | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या व विद्युत** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **गल्ली नगर ६, अमरावती** | | | व्यासाच्या) काढण्यास हरकत नाही. फांद्या काढताना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात. सार्वजनिक जागेवर वृक्ष असल्यामुळे मनपा उद्यान विभागाने फांद्या काढण्याची कार्यवाही करावी. उचित निर्णयास सादर | **तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | **सौ.संगीता अनिल सागोले, १३, दरोगा प्लॉट, राजापेठ अमरावती** | कडुनिंब, बकान | २ | दिनांक १५/०९/२०२५ रोजी मा. तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.कडूनिंब वृक्ष व बकाण वृक्ष दोन्ही वृक्ष सार्वजनीक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेली हिरवीगार आहेत. कडूनिंब वृक्षाच्या रस्त्याकडे (अर्जदाराचे घराकडे) झुकलेल्या फांद्या २-३ इंच व्यासाच्या काढण्यास हरकत नाही.फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी. सार्वजनिक जागेवर वृक्ष असल्यामुळे मनपा उद्यान विभागाने फांद्या काढण्याची कार्यवाही करावी. उचित निर्णयास सादर. | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या सार्वजनिक जागेवरील वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३. | **धापीबाई जैन व मिथील मुणोत, बिछराज प्लॉट, अमरावती** | कडुनिंब, वड, पिंपळ, गुलमोहर, बाभुळ व उंबर | १२ | दिनांक १५/०९/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.धापीबाईजैन सूतिकागृह या नावाने प्रॉपटी असलेल्या जुन्याइमारती पाडण्याचे काम सुरु असल्याचे दिसून आले सदर जागा ३६,०००/- (छत्तीस हजार स्के.फु) स्केअर फुटांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात आले. भोगटदार असलेले श्रीमती. धापीबाई जैन व श्री. मुनोत यांचा अर्ज दिसून येतो. अर्जदाराला सदर जागेवर प्लॉट पाडायचे आहे व नंतर बांधकाम करावयाचे असल्याचे सांगण्यात आले. लेआउट मंजुरी व बांधकाम मंजुरी अद्याप प्राप्त झाली नसल्याचे सांगण्यात आले. सदर रिकाम्या जागेवर १२ विविध प्रजातीची (त्यात कडूनिंब, वड, पिंपळ, गुलमोहर बाभूळ, उंबर आदी वृक्ष छान वाढलेली (अंदाचे १५ ते ३० वर्षाचे आहेत) व हिरवी गार आहेत. लेआउट मंजुरी प्राप्त झाल्यानंतर / बांधकाम मंजुरी संसनर विभागाने दिल्यांनतर वृक्ष काढण्याबाबत नियमानुसार विचार करता येईल तूर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व वृक्षाला कोणतिही इजा पोहचवू नये असे सूचित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर. | **लेआउट मंजुरी प्राप्त झाल्यानंतर / बांधकाम मंजुरी संसनर विभागाने दिल्यांनतर वृक्ष काढण्याबाबत नियमानुसार विचार करता येईल** | **तूर्तास वृक्ष काढण्याची परवानगी स्थगित ठेवण्यात येत आहे.** |
| ४ | **मा .मुख्याध्यापिका श्री शिवाजी मराठा** | उंबर ,कडूनिंब वृक्ष | २ | दिनांक १६/०९/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.भिंतीत निघालेला १ उंबर वृक्ष व १ कडूनिंब वृक्षाची विनापरवानगी छाटणी केल्याबद्दल प्रत्येकी | **वृक्षाची विनापरवानगी छाटणी केल्याबद्दल प्रत्येकी** | **वृक्षाची विनापरवानगी छाटणी केल्याबद्दल प्रत्येकी ५,०००/-** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **हायस्कूल ,स्टेशन शाखा ,अमरावती** | | | ५,०००/- रुपये दंड आकारण्यात यावा तसेच सदर वृक्ष तोडण्याबाबतचा अर्जानुसार ठेव स्वीकारून ६ वृक्ष लावण्याचे अटीवर नियमानुसार २ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. अर्जदाराचा खुलासा मान्य करण्यात यावा अर्जदाराला शाळेच्या शिकस्त भिंती काढून नवीन भिंती व प्लास्टर करावयाचे आहे. त्याकरिता वृक्ष काढणे गरजेचे आहे. अर्जदाराचे परिसरात शाळेच्या आवारात २८ वृक्ष विविध प्रजातीची छान वाढलेली व हिरवीगार आहेत उचित निर्णय सादर | **५,०००/- रुपये दंड आकारण्यात यावा.वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **रुपये दंड आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी. नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर २ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

# झोन क्र.३

| **अ.क्र.** | **अर्जदाराचे नाव व पत्ता** | **वृक्षाचे वर्णन** | **झाडांची संख्या** | **तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल** | **चर्चा** | **वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.किशोर गुल्हाने रा.कलोती नगर अम. | | २ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सार्वजनिक जागेवर असलेल्या २ वृक्षाच्या विद्युत तारेवरील फांद्या उद्यान विभाग कडून काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | **सार्वजनिक जागेवरील विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **सार्वजनिक जागेवरील विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | श्री.गौतम चोरपागर व इतर नागरिक रा.महादेव खोरी अम. . | पिंपळ | १ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,पिंपळ वृक्ष सार्वजनिक रस्त्याच्या कडेला असून फांद्या विद्युत वाहिनीवर वाढलेल्या आहेत.त्यामुळे अडचणीच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागाकडून तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **सार्वजनिक जागेवरील विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **सार्वजनिक जागेवरील विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | श्री. संजय काळबांडे सरस्वती | वृक्षाच्या फांद्या | | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, शाळेच्या पटांगणातील दोन वृक्षाच्या फांद्या झुकलेल्या आहेत. | **अडचणीच्या फांद्या तोडण्याची** | **वृक्षाच्या अडचणीच्या** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यालय विद्यापीठ कॉलोनी अम. | | | शाळेतील विद्यार्थी खेळतात.करिता अडचणीच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **परवानगी देण्यास हरकत नाही.** | **फांद्या तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | श्री.दिपक लोणकर राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय | वाळलेले वृक्ष, विविध वृक्ष | ५<br>१५ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,ग्रामीण पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणातील इमारतीवर पसरलेल्या व पोलीस वसाहती मधील घरावर व विद्युत वाहिनीवर आलेल्या २-४ इंच व्यासाच्या विविध वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.व पोलीस ग्राउंड भोवतालचे ५ वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.तसेच २ लहान वृक्ष कोसळून पडलेले आहेत त्याची विल्हेवाट लावण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **२ लहान कोसळून पडलेले व ५ वाळलेले वृक्ष काढण्यास हरकत नाही. वृक्षाच्या इमारतीवर पसरलेल्या व पोलीस वसाहती मधील घरावर व विद्युत वाहिनीवर आलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **२ लहान कोसळून पडलेले व ५ वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. वृक्षाच्या इमारतीवर पसरलेल्या व पोलीस वसाहती मधील घरावर व विद्युत वाहिनीवर आलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्री.किशोर अघम रा.राजेंद्र नगर अम. | सप्तपर्णी शेवगा आवळा | २<br>१<br>१ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, घराच्या आवारातील २सप्तपर्णी,एक आवळा,एक शेवगा वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे आवारातील झाडाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे आवारातील झाडाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्री.चंद्रकांत खानझोडे रा.वनश्री कॉलोनी | सागवान वृक्ष | ३ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, घराच्या आवारात असलेले ३ सागवान वृक्ष अंदाजे ८० से.मी.वाढलेली आहे.सागवान नियमानुसार तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **सागवान वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ३ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७ | श्री.निशिकांत गंधेवार रा.वनश्री कॉलोनी . | सागवान | ३ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, घराच्या आवारात असलेले २ सागवान वृक्ष अंदाजे ७० से.मी.वाढलेली आहे.एक सागवान वृक्ष वाळलेला आहे.सागवान नियमानुसार तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **एक सागवान वृक्ष वाळलेला आहे.सागवान वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **एक वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे वृक्ष** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **लावण्याचे अटीवर २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८ | श्री.राजकुमार सावरकर रा.व्यंकटेश कॉलोनी अम.(तक्रार) | कडूनिंब | १ | दि.१८/०९/२५ रोजी मा.वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,रोडच्या बाजूला दुकानासमोर कडूनिंब वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या २ फांद्या गैर अर्जदार श्री.खडसे यांनी कापल्याची तक्रार श्री राजकुमार सावरकर यांनी केली आहे.प्रत्यक्ष २ लहान फांद्या कापण्यात आल्या आहे.उर्वरित कडूनिंब वृक्ष सुव्यवस्थित आहे.अर्जदाराने सांगितल्या प्रमाणे गृहीत धरता श्री.खंडारे यांना विनापरवानगी फांद्या तोडल्याबद्दल ताकीद देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **गैर अर्जदार श्री.खडसे यांना विनापरवानगी झाडाच्या फांद्या कापणेबाबत ताकीद देण्यात यावी. .** | **गैर अर्जदार श्री.खडसे यांना विनापरवानगी झाडाच्या फांद्या कापणेबाबत ताकीद देण्यात यावी व यापुढे असे न करण्याबाबत सूचित करावे.** |
| ९ | गैर-अर्जदार श्रीमती शकुंतला भोवते रा.भोवते ले-आऊट अमरावती. | | | सदर प्रकरणात गैर-अर्जदार श्रीमती शकुंतला भोवते रा.भोवते ले-आऊट यांनी त्यांच्या घरातील परिसरात असलेले एक कडूनिंब वृक्ष विनापरवानगी तोडले होते.त्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती.मागील सभा दि.१८/०७/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २८ नुसार २०,००० रुपये दंड करण्यात आला होता,त्याबाबत त्यांनी दंड कमी करण्याबाबत अर्ज केला आहे.त्यामध्ये त्यांनी वृक्ष अवाढव्य वाढल्याने वृक्षाच्या फांद्या विद्युत तारांवर व घरावर येत होत्या.मी वयोवृद्ध महीला असून माझे पती मरण पावले आहे.माझ्या हृदयाची शस्त्रक्रिया झाली आहे.माझ्या जवळ माझा लहान नातू राहतो तो बाहेर खेळतो.वृक्षाच्या फांद्या अंगावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.या कारणास्तव कडूनिंब चे झाड तोडण्यात आले.या बाबीचा सहानुभूती पूर्वक विचार करून मला दंड कमी करण्यात यावा ही विनंती. उचित निर्णयास्तव सादर | **दंड माफ करता येणार नाही.** | **सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.** |
| १० | गैर-अर्जदार श्रीमती सुशीला मेश्राम रा.लुंबिनी नगर अम. | | | गैर-अर्जदार श्रीमती सुशीला मेश्राम यांनी विना परवानगी एक पिंपळ वृक्ष तोडून फक्त खोड शिल्लक ठेवले होते त्याबाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती.त्यांचा खुलासा मागील सभा दि.१८/०७/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २७ नुसार अमान्य करून २०,००० रुपये दंड करण्यात आला.त्यावर त्यांनी पुन्हा अर्ज केला असून त्यामध्ये त्यांनी मी अज्ञान असल्याने मला वृक्ष तोडण्याची परवानगी काढावी लागते याची माहिती नव्हती.माझ्या कडून चूक झाली आहे. माझी परिस्थिती अत्यंत हलाखीची | **दंड माफ करता येणार नाही.** | **सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | असून मला रमाई आवास योजनेचा घरकुल बांधण्याकरिता निधी मिळाला आहे.माझ्या चुकीची भरपाई म्हणून १० वृक्ष लाऊन देते व त्याचे पालन पोषण करते.करिता मला माफ करून दंड माफ करण्यात यावा ही विनती. उचित निर्णयास्तव सादर | | |

# झोन क्र.४

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री रमेश नत्थुजी धाकडे. रा.खंडेश्वर कॉलोनी,साई नगर,अमरावती | आंबा | **१** | **दि. २९/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** आंबा वृक्ष अर्जदाराचे शेजारी राहणारे नरेश डाफ यांचे घराचे आवारात छान वाढलेला व हिरवेगार आहे अर्जदाराच्या घराकडील फांद्या पूर्वीच काढण्यात आल्याचे दिसून आले. वूक्षामुळे कोणतीही अडचण दिसून येत नाही सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदाराचे घरी एकही वृक्ष लावलेला दिसून आला नाही. कुंडीत फुलझाडे दिसून आलीत. सबब अर्जदाराचा २००० स्क़.फूट प्लॉट असल्याचे सांगण्यात आले. करिता अर्जदारास नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या प्रकरण ५, कलम ९(१) नुसार किमान २ वृक्ष लावण्याबाबत सूचित करण्यात यावे व ९० दिवसाचे आत अहवाल वृक्ष प्राधिकरणास देण्याचे सूचित करावे. असे करण्यास कसूर केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे सुचवावे. **अहवालानूसार वृक्ष तोडण्याची मंजुरी नाकारण्याकरिता सादर.** | **अर्जदार यांना त्यांचे घराचे परिसरात २ वृक्ष लावण्याबाबत सूचित करावे.** | **अर्जदार यांना त्यांचे घराचे परिसरात २ वृक्ष लावण्याबाबत सूचित करावे तसा अहवाल देण्याबाबत सूचित करावे.** |
| २ | श्री. अशोक कामकरे रा.पाचबंगला, जुनिवस्ती,बडनेरा | कडूनिंब | **१** | **दि. १७/०९/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल**:-अर्जदाराचे राहत्या घराचे परिसरात कडूनिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे अर्जदाराचे घराकडे व पूर्वेस झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. **अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | **अर्जदाराचे घराकडे व पूर्वेस झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे व पूर्वेस झुकलेल्या २ -४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | पोलिस स्टेशन, | कडूनिंब | **२** | **दि.१७/०९/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-**बडनेरा पोलीस स्टेशन | **मुख्य प्रवेश गेटवरील** | **मुख्य प्रवेश गेटवरील** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नवीवस्ती,बडनेरा | | | परिसरातील मुख्य प्रवेश गेटवरील २ कडूनिंब वृक्षांच्या झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.फांद्या काढतांना वृक्षांचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरीकरिता सादर.** | **झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **झुकलेल्या वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | गैरअर्जदार श्री.दिलीपभाई पोपट,अध्यक्ष, जलाराम सत्संग मंडळ,भक्तीधाम, साईनगर, अमरावती. | पिंपळ | १ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांना अवैध पिंपळ वृक्षाच्या फांद्या तोडल्याबाबत जा.क्र.३७५९/२०२५ दिनांक ०८-०८-२०२५ रोजी खुलासाचे पत्र देण्यात आले आहे. खुलासाचे उत्तर अद्याप अप्राप्त होते.सभा दि ०२-०९-२०२५ रोजीचे ठराव क्र ५ अन्वये गैरअर्जदारास ५०००/- रुपये दंडात्मक कार्यवाही करण्यात आले आहे परंतु गैरअर्जदार यांनी दि. ०२-०९-२०२५ रोजी खुलासा सादर केला सदर खुलासाचे मा. तांत्रिक सदस्य यांनी अवलोकन केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-दि .** १७/०९/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. भक्तीधाम मंदिर जलाराम सत्संग मंडळ बडनेरा रोड अमरावती यांचे परिसरातील पिंपळ वृक्ष शेजारी राहणारे श्री. सागर अग्रवाल यांनी मंदिर प्रशासनाला न विचारता अवैधपने तोडून टाकल्याचे सांगण्यात आले.त्याची तक्रार पोलीसात करण्याचेही सांगण्यात आले. सबब मंदिर व्यवस्थापनाने वृक्ष तोड केलेली नाही असे दिसून आले, मंदिर परिसरात ५० पेक्षा अधिक मोठमोठी वृक्षवेली आहेत. सबब मंदिर प्रशासनाने सादर केलेला खुलासा मान्य करण्यात यावा व पुढील कारवाई पोलीस रिपोर्टची प्रत मिळाल्यानंतर श्री.अग्रवाल यांना विचारणा करून खुलासा मागविण्यात यावा.<br>**सदर आपला माहितीस व उचित निर्णयास सादर** | **Subject matter to police station दंड माफ करण्यास हरकत नाही.** | **दंड रद्द करण्यात येत आहे. पोलीस स्टेशन चा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकरण सादर करावे.** |
| ५ | श्री प्रदीप केशव सावळा राह. शेत सर्वे नं. ७६/१, मौजे बडनेरा | कडूनिंब | ८ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** अर्जदाराने शेत विकण्यास काढले असून श्री विजय गोपाल यांचेशी सौदा झाल्याचे समजले श्री विजय गोपाल प्रत्यक्ष स्थळी हजर होते. सबब शेताच्या संपूर्ण परिसरात किती वृक्ष आहेत त्याची खालील प्रमाणे यादी मागविण्यात यावी त्यानंतर पुढील बाबी ठरविता येईल.<br>**अ.क्र** \| **वृक्ष क्र** \| **वृक्षाचे नाव** \| **वृक्षाचे वय** \| **वृक्षाची उंची** \| **वृक्षाचा घेरा**<br>तूर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याबाबत व | **वृक्ष काढण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वृक्षाला इजा पोहोचू नये असे अर्जदारास याबाबत जा..क्र ३५५६ दि. ३१/०७/२०२५ अन्वये पत्र देण्यात आले. त्यानंतर अर्जदाराने दि.१०-०९-२०२५ रोजी मागविण्यात आलेली माहिती सादर केली मा. तांत्रिक सदस्य यांनी अवलोकन केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- दि.**१७/०९/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.अर्जदाराकडे शेतजमीन ( कृषक जमीन) असून जमिनीला कंपाउंड घालावयाचे असल्याने बांधावरील वृक्ष तोडण्याची परवानगी मागितलेली आहे. शहरी क्षेत्रात कृषक जमिनीवरील बांधावर असलेली वृक्ष तोडण्याबाबत परवानगी देता येत ( साग विषयक धोरणानुसार ) नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी वृक्षाला कोणतीही प्रकारची इजा पोचवू नये असे सूचित करण्यात यावे.<br>**अहवालानूसार वृक्ष तोडण्याची मंजुरी नाकारण्याकरिता सादर.** | | |

सूचना/दुरुस्ती :-

१.मागील सभेमध्ये झालेल्या कार्यवाहीचा सर्व झोन कार्यालय यांनी अहवाल सादर करावा.

२.मागिल दि.०२.०९.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेमधील झोन क्र.२ अंतर्गत विषय क्र.३ मधील झालेल्या ठरावामध्ये अवधानाने २०,०००/- च्या ऐवजी ६०,०००/- असे लिहिल्याने त्याऐवजी २०,०००/- हि सुधारणा करण्यात येत आहे.

३. मागिल दि.०२.०९.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेमधील वेळेवरील विषय क्र.१ (झोन क्र.२)यामध्ये सदर वृक्ष दुकानाला लागून असून वाकलेला असल्याने व सदर वृक्ष सार्वजनिक जागेवर असून अनामत रक्कम न घेता वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

४.झोन क्र.४ मधील अर्ज क्र.१ मध्ये तीन(३) वाळलेले सागवान वृक्ष ठेव न स्विकारता दुरुस्ती घेऊन वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by
SHILPA INDALCHAND NAIK
Date: 06-10-2025
16:01:04

**अतिरिक्त आयुक्त-२**

**महानगरपालिका, अमरावती**